## निशाणी क्र. २२ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज दरखास्तदार यांनी वाद मिळकतीची मोजणी करुन हद्द कायम करुन बेलिफ मार्फत वाद ग्रस्त जागेचा ताबा डिक्रीधारी यांना मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत प्रकरण हे वाद मिळकतीचा ताबा मिळण्याकरीता दरखास्तदार यांनी दाखल केलेले आहे. सदर वाद मिळकतीचा ताबा देण्यापूर्वी सदर भुखंडाचे मोजणी करुन हद्द कायमकरीता सिमांकन करुन घेणे आवश्यक आहे. सदर मालमत्तेमध्ये किती जागेवर अतिक्रमण आहे ही वस्तुस्थिती जाणुन घेण्याकरीता कोर्ट कमिशनर मार्फत करुन हद्द कायम करण्याची आवश्यकता असल्याने त्यांनी उप–अधिक्षक भुमिअभिलेख यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेबाबत विनंती केली आहे. त्याच बरोबर सदर मोजणी पोलीस संरक्षणामध्ये होणेकरीता देखील त्यांनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास ऋणको यांनी म्हणणे दाखल करुन सदर प्रकरणातील न्यायनिर्णयावर मा. जिल्हा न्यायाधिश–२ चंद्रपूर येथे नियमित दिवाणी अपिल क्र. ५/२०२१ हे प्रलंबित असल्याचे तसेच सदर प्रकरणामध्ये डिक्रीधारी यांनी कोणतेही उत्तर दाखल केले नाही व सदर अपिल सुनावणीकरीता प्रलंबित असल्याचे कथन करुन सदर अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

४. या प्रकरणी दिनांक ०७.०९.२०२३ कडील आदेशान्वये दरखास्तदार यांना त्यांचे शपथपत्र दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यांनी नि.क्र. २३ कडे

शपथपत्र दाखल करुन ते सदर अपिलाचे प्रकरणामध्ये दिनांक ०७.०५.२०२१ रोजी ॲड दिवसे यांचेमार्फत हजर झाले असून सदर प्रकरण सुनावणीसाठी मुकरर असल्याचे कथन केले आहे. तथापि, सदर शपथपत्रामध्ये त्यांनी न्यायालयाने आदेश केल्याप्रमाणे ऋणको यांच्या त्यांनी उत्तर दाखल केले नसल्याच्या आरोपाबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्याच बरोबर ऋणको यांच्या वकिलांनी डिक्रीधारी अपिलाच्या सुनावणीमध्ये हजर राहात नसल्याबाबत केलेल्या आरोपाबाबत देखील स्पष्टीकरण दिलेले नाही. सबब, या परिस्थितीत मा. जिल्हा न्यायालय यांचे आदेश होईपर्यंत सदर प्रकरण स्थगित ठेवणे योग्य होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मा. जिल्हा न्यायाधिश, चंद्रपूर यांचे अपिल क्र. ५/२०२१ या प्रकरणामध्ये आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात येतो.

P.G.Lambe
Digitally signed by P.G.Lambe
Date: 2023.12.15 17:41:12 +0530

**(पी.जी.लंबे)**
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
गोंडपिपरी.

दिनांक : १४.१२.२०२३